# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 13 March 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १३ मार्च २०२४ दुपारी १.०० वा.**

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज सुमारे सव्वा लाख कोटी रुपयांच्या तीन सेमीकंडक्टर प्रकल्पांची दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून पायाभरणी केली. गुजरातमध्ये ढोलेरा आणि साणंद, तर आसाममध्ये मोरीगाव इथं हे प्रकल्प आहेत. देशातल्या तरुणांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करून सेमीकंडक्टर संरचना, उत्पादन आणि तंत्रज्ञान विकासासाठी भारताला जागतिक केंद्र म्हणून स्थापित करण्याचा पंतप्रधानांचा दृष्टिकोन आहे. या सुविधांद्वारे सेमीकंडक्टर परिसंस्था बळकट होईल आणि सेमीकंडक्टर उद्योगात तसंच इलेक्ट्रॉनिक्स, दूरसंचार इत्यादी संबंधित क्षेत्रांमध्ये रोजगार निर्मितीला चालना मिळेल, असं पंतप्रधान यावेळी म्हणाले. भारत आगामी काळात सेमीकंडक्टर उत्पादनात जागतिक केंद्र बनणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

'इंडियाज टेक एड: चिप्स फॉर विकसित भारत' या कार्यक्रमात देखील पंतप्रधानांनी दूरदृश्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून युवकांना संबोधित केलं.

****

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी तीन लाख रिक्त पदांसह नॅशनल कॅडेट कॉर्प्स- एनसीसीच्या विस्ताराच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. या विस्तार योजनेंतर्गत, चार नवीन गट मुख्यालयं आणि दोन नवीन एनसीसी युनिट्सची स्थापना केली जाईल, तसंच माजी सैनिकांना एनसीसी प्रशिक्षक म्हणून नियुक्त केलं जाईल. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार एनसीसी हा पर्यायी विषय म्हणून ठेवण्यात आला असल्याचं संरक्षण मंत्रालयानं सांगितलं. या विस्ताराद्वारे सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधून एनसीसी कॅडेट्सची भरती केली जाईल.

****

जालना रेल्वे स्थानकावर तयार करण्यात आलेल्या कोच देखभाल सुविधा – पिटलाईनचं आज केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या हस्ते उद्घाटन झालं. या पिटलाईनमुळे जालना इथून नवीन रेल्वे गाड्या सुरु होण्यास अडचण येणार नाही, असं ते म्हणाले. मुंबई – जालना वंदे भारत एक्स्प्रेसचा मुंबई इथून सुटण्याच्या वेळेत बदल करून ही गाडी संध्याकाळी पाच  वाजेदरम्यान सोडण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकार्यांना दिल्या. नांदेड रेल्वे विभागातलं विद्युतीकरणाचं काम या महिना अखेरीस पूर्ण होईल, अशी माहिती दानवे यांनी दिली.

****

हैदराबाद मुक्तिसंग्राम दिन दरवर्षी १७ सप्टेंबर रोजी देशपातळीवर साजरा केला जाणार आहे. केंद्रीय गृहमंत्रालयानं काल यासंदर्भात अधिसूचना जारी केली. याबद्दल तुळजापूरचे आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्यासह मराठवाडा मुक्तीसंग्राम अमृतमहोत्सव समीतीचे संयोजक युवराज नळे आणि इतर पदाधिकारींनी केंद्र सरकारचे आभार मानले आहेत.

****

मराठा आरक्षण कायद्याला अंतरिम स्थगिती द्यायला मुंबई उच्च न्यायालयानं नकार दिला आहे. तसंच या कायद्याला विरोध करणाऱ्या याचिका आणि इतर जनहित याचिकांवर येत्या १० एप्रिलला एकत्रितपणे सुनावणी केली जाईल, असं न्यायालयानं काल झालेल्या सुनावणीत सांगितलं. यासंदर्भात न्यायालयाने राज्य सरकारला दोन आठवड्यांत उत्तर देण्याचे निर्देश दिले आहेत. महाराष्ट्र राज्य सर्व याचिकांमध्ये सामायिक प्रतिज्ञापत्र दाखल करेल, प्रत्येकाला वेगवेगळं उत्तर देण्याची गरज नाही, असं न्यायालयानं म्हटलं आहे.

****

आकाशवाणी छत्रपती संभाजीनगरच्या प्रादेशिक वृत्तविभागात, कंत्राटी तत्वावर अर्धवेळ वार्ताहर नियुक्त करण्यासाठी अर्ज मागवण्यात येत आहेत. शैक्षणिक पात्रता, अनुभव, वय या अर्हतेसाठी इच्छुकांनी newsonair.gov.in/vacancies या संकेतस्थळाला भेट द्यावी. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज उद्या १४ मार्चपर्यंत सी एस एन आर एन यू डॉट ए डी एम एन ॲट जीमेल डॉट कॉम या ईमेलवर, किंवा, कार्यालय प्रमुख, प्रादेशिक वृत्त विभाग- आकाशवाणी, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर, या पत्यावर पाठवावेत.

****

नाशिक इथं जिल्हा गुंतवणूक परिषदेचं उद्घाटन काल जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्या हस्ते झालं. मागील वर्षात जिल्ह्यात १५८ नवउद्योजकांनी सुमारे १३ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली असून साधारणपणे १९ हजार रोजगार उपलब्ध होतील अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.

****

पालघर जिल्ह्यात पोषण अभियानाअंतर्गत २०२३-२४ या आर्थिक वर्षात अंगणवाडी सेविका आणि पर्यवेक्षिका, मुख्य सेविकांना काल मोबाईलचं वाटप करण्यात आलं. पालघर जिल्ह्यात प्रत्येक अंगणवाडी सेविका आणि मुख्य सेविकेला जवळपास तीन हजार ४५३ मोबाईल देण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेनं दिली आहे.

****

नांदेड जिल्ह्यात उद्या पंडित दीनदयाळ उपाध्याय ऑनलाईन रोजगार मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं आहे. या रोजगार मेळाव्यात नामांकित कंपन्यांकडून ऑनलाईन मुलाखती घेण्यात येणार आहेत. इच्छुक उमेदवारांनी डब्ल्यू डब्ल्यू डब्ल्यू डॉट महा स्वयम डॉट जीओव्ही डॉट इन, या संकेतस्थळावर नावनोंदणी करून या संधीचा लाभ घ्यावा, असं आवाहन नांदेड जिल्हा कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्तांनी केलं आहे.

****